# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ६०

## (सभावृत्तांत)

दिनांक – २५/०४/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २५/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर-अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.तुपे, मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोराटे, मा.खोत,मा.झगडे,मा.राऊत,मा.चितळे,मा.कापडणीस-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण -मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.गलबले,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,

मा.भोसले,मा.मोरे,मा.घुबे,मा.देशमुख,मा.पवार-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी,मा.गावडे-अग्निशमन अधिकारी, मा.चारटणकर-सहव्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २३) बुके,फुले,शाल,श्रीफळ यांचा खर्च बंदचे धोरण करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २४) मोठी साईजची दैनंदिनी (डायरी) छपाई बंदचे धोरण करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २५) सिक्कीम दौरा मान्यतेचा ठराव रद्द करणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २६) मा.स्थायी समिती ठ.क्र.२५८१ दि.१८/४/२०१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २७) पिंपरी चिंचवड क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे मुख्यालय क्र.२ पुर्वीप्रमाणे सुरु करणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) केरळ दौरा ठराव रद्द करणेबाबत-मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २९) नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत प्रसिद्ध केलेली ई-निविदा रद्द करुन नवीन कोर्सेस सुरु करणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) मे.Air India कडील Shubh Yatra Magazine मासिकामध्ये लेख प्रसिद्ध करणेबाबत...

--------

दिनांक १८/०४/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -२५८४ विषय क्रमांक - १
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/४२४६/२०१८ दि.५/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६ कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख) फक्त तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट ८१.५६ कोटी, विविध प्रकारचे पासेस र.रु.२३ कोटी व बसेस खरेदी र.रु.६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रक्कमेतून प्रतीमहा रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु.सात कोटी पन्नास लाख) फक्त माहे एप्रिल २०१८ ते फेब्रुवारी २०१९ अखेर ११ महिने अग्रीम स्वरुपात अदा करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांस संचलन तुट व विविध प्रकारचे पास यापोटी दरमहा र.रु.७.५० कोटी याप्रमाणे माहे एप्रिल १८ ते फेब्रु १९ अखेर ११ महिने अग्रिम स्वरुपात अदा करणेस मान्यतेबाबतचा विषय मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणेत आला आहे. अशा स्वरुपाची ११ महिन्यांची सरसकट थेट मान्यता न देता प्रथम १ महिन्यांसाठी संचलन तुट व विविध प्रकारचे पास यापोटी र.रु.७.५० कोटी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रशासनाने यापुढे पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना संचलन तुट व विविध प्रकारचे पास यापोटी पुढील रक्कम अदा करणेबाबत प्रत्येक महिन्यांनी नव्याने प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८५ विषय क्रमांक - २
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – अग्निशामक
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.अग्नि/२/कावि/३८३/२०१८ दि.६/४/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अग्निशामक विभागाचे तांत्रिक स्वरुपाचे कामकाज, तीन पाळ्यांमध्ये २४ तास अग्निशामक वाहंनाची कामकाजाची गरज लक्षात घेता, अग्निशामक दलाकरीता पंप मेकॅनिक-०२, मोटार मेकॅनिक-०३ व कनिष्ठ अभियंता-०१ अशा एकुण ०६ तांत्रिक कर्मचा-याचीं सोबतच्या प्रपत्रानुसार अर्हते प्रमाणे निवड केलेनुसार मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता मोटार मेकॅनिक, पंप मेकॅनिक पदाकरीता मासिक एकवट मानधन र.रू.१५,०००/- व कनिष्ठ अभियंता पदाकरीता मासिक एकवट मानधन र.रू.२०,०००/- मानधनावर नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८६ विषय क्रमांक - ३
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/२३५/१८ दि.६/३/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १६ ) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८७ विषय क्रमांक - ४
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षेका/नि-४/कावि/२५५/२०१८ दि.१७/४/२०१८

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 3) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८८ विषय क्रमांक - ५
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८३/२०१८ दि.१२/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२६/०३/२०१८ ते दि.०१/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८३/२०१८ दि.१२/०४/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८९ विषय क्रमांक - ६
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.वि.मुका/५/कावि/१९५/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (१ ते ८) मधिल निविदा कामांचे अवलोकन होऊन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९० विषय क्रमांक - ७
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/११६/२०१८ दि.१८/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील पवना व इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प राबविणेसाठी (लांबी अंदाजे १८ व १६ कि.मी.) या क्षेत्रातील अनुभवी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेसाठी निविदा क्रमांक Env/06/2017-18 अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त निविदांमधील मे.एच.सी.पी. डिझाईन प्लॅनिंग अन्ड मॅनेजमेंट प्रा.लि, अहमदाबाद यांनी प्रस्तावात नमुद तक्त्यामध्ये सुधारित दराने म्हणजेच पवना नदीसाठी (१८ कि.मी.) र.रु.२,००,७०,०००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी सत्तर हजार फक्त) व इंद्रायणी नदीसाठी (१६ कि.मी.) र.रु.१,७८,४०,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी अठ्याहत्तर लाख चाळीस हजार फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व निविदा अटी शर्तीनुसार करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९१ विषय क्रमांक - ८
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/०१/कावि/४५६/२०१८ दि.१८/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

तळवडे गावठाण परिसरातील जुन्या ग्रामपंचायत इमारतीमध्ये नवीन दवाखाना (ओ.पी.डी.) सुरु करणे बाबत तसेच नवीन दवाखान्यासाठी डॉक्टर व अन्य कर्मचा-यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५९२ विषय क्रमांक - ९

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १०४ दिनांक १३/०४/२०१८ नुसार,

मनपा संत तुकारामनगर येथील वल्लभभाई पटेल बॅडमिंटन हॉल संत तुकाराम नगर, पिंपरी १८ हा युनिट वेलफेअर सोशल फौंडेशन, संत तुकारामनगर, पिंपरी – १८ या संस्थेस दरमहा र.रु.१२,८५०/- (अक्षरी र.रू.बारा हजार आठशे पन्नास फक्त) भाडे आकारुन ११ महिने कराराने चालविण्यास दिलेला आहे. याच धर्तीवर मनपाचा भोसरी दिघी रोडवरील सर्व्हे नं.२२४, १/१ मधील गंगोत्री पार्क जवळील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा बॅडमिंटन हॉल महेशदादा स्पोर्ट्स फौंडेशन रजि.नं.महा/२५०/२००४/पुणे या संस्थेस ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९३ विषय क्रमांक - १०

दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – झो.नि.पु.स्थापत्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/कावि/२२५/२०१८ दि.१०/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

झोनिपु विभागामधील जी विकासकामे चालू आहेत किंवा पुर्ण झाली आहेत, त्यासाठी दि.३१/०३/२०१८ पुर्वी बिलाची रक्कम देता येणे शक्य नाही अशा ठेकेदारांना अंदाजपत्रकीय रक्कम तातडीने उपलब्ध करुन बिले अदायगी करण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना मा.आयुक्त पिं.चिं. मनपा यांनी दि.३१/०३/२०१८ चे पत्र क्र.स्था/लेखा/७/कावि/२५३/१८ अन्वये केली आहे. त्यास अनुसरुन झोनिपु स्थापत्य विभागाकडील वर्गीकरण करणे बाबतची प्रस्तावात नमुद केलेली विकास कामे समायोजित करून, सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशिर्षामध्ये वाढ/घट करुन सुधारीत तरतुद करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.१७,९०,६७३/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९४ विषय क्रमांक - ११
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१९६८/२०१८ दि.२०/०४/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७८/१-२०१७-१८ चिखली से.क्र.१७ व १९ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबविणेत येणाऱ्या घरकुल योजना प्रकल्पास आर.सी.सी. कमान बांधणेकामी मे.श्री नागेश्वर कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,२६,२९१/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख सव्वीस हजार दोनशे एक्याण्णव फक्त) पेक्षा १२.१०% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा २३.१५% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.२०,४४,८१०/- (अक्षरी र.रू.वीस लाख चव्वेचाळीस हजार आठशे दहा फक्त) पर्यंत काम करून घेणेस त्यांचे बरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९५ विषय क्रमांक - १२
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३२/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ह या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांच्या समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/ मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/ प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.४,२८,६६,४७२/- (अक्षरी र.रू.चार कोटी अठ्ठावीस लाख सहासष्ठ हजार चारशे बाहत्तर फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९६ विषय क्रमांक - १३
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३४/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सह शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील जलनि:सारण इ, ह क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. प्रस्तावात नमुद केले प्रमाणे विभागाअंतर्गत र.रु.१२,००,०००/- (अक्षरी र.रू. बारा लाख फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९७ विषय क्रमांक - १४
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३१/२०१८ दि.११/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ग या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रू.७३,२६,०००/- (अक्षरी र.रू.त्र्याहत्तर लाख सव्वीस हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९८ विषय क्रमांक - १५
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०२९/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील फ या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.५,०८,३९,५९०/- (अक्षरी र.रू.पाच कोटी आठ लाख एकोणचाळीस हजार पाचशे नव्वद फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५९९ विषय क्रमांक - १६
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३०/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील इ या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.२,२६,७१,०००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी सव्वीस लाख एक्काहत्तर हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६००  विषय क्रमांक - १७
दिनांक – २५/०४/२०१८  विभाग – लेखा
सूचक – मा.नम्रता लोंढे  अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०२८/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ड या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेली आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रु.२,९७,७६,३१४/- (अक्षरी र.रू. दोन कोटी सत्याण्णव लाख शहात्तर हजार तीनशे चौदा फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०१  विषय क्रमांक - १८
दिनांक – २५/०४/२०१८  विभाग – लेखा
सूचक – मा.विलास मडिगेरी  अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०२७/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील क या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.३,८८,९८,०००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी आठ्याऐंशी लाख अठ्याण्णव हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०२ विषय क्रमांक - १९
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०२५/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील अ या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.१,८१,४७,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी एक्याऐंशी लाख सत्तेचाळीस हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०३ विषय क्रमांक - २०
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०२६/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ब या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेली आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.१,४०,९८,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी चाळीस लाख आठ्याण्णव हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०४ विषय क्रमांक - २१
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३३/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील स्थापत्य उद्यान विभागाचे काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. अशा कामांच्या दि. ३१/०३/२०१८ पर्यंत बिलांची अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. भांडवली अंदाजपत्रकातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रू.२०,००,०००/- (अक्षरी र.रू.वीस लाख फक्त) विभागांतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०५ विषय क्रमांक - २२
दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/५०३५/२०१८ दि.१७/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता भाग-३ मध्ये ठेकेदार अनामत या लेखाशिर्षावर र.रु.१५० कोटी तरतुद करण्यात आलेली होती. दिनांक ६/१/२०१८ पर्यन्त एकूण र.रु.१४७.२८ कोटी प्रत्यक्ष खर्च झाल्याने सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजपत्रकात र.रु.१०० कोटी वाढ करुन पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता भाग-३ मध्ये ठेकेदार अनामत या लेखाशिर्षावर र.रु.२५० कोटी तरतुद करण्यात आलेली होती. दिनांक १६/३/२०१८ पर्यन्त एकूण र.रु.२४९.९८ कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला असून एक लाख छत्तीस हजार शिल्लक होते. सदरचे आर्थिक वर्षामध्ये बयाणा व सूरक्षा ठेवीची रक्कम मोठया प्रमाणात घेतल्या गेल्याने ही तरतुद मुदतीपूर्वीच संपलेली आहे व ठेकेदारांकडील बयाणा व सूरक्षा ठेवीची रक्कम अदा करणे प्रलंबित होते. यापुढे मार्च १८ वर्ष अखेरीस साधारणत: १० दिवस कालावधी बाकी असल्याने त्यावर वाढीव र.रु.१५० कोटी तरतूद करणे आवश्यक होते वाढीव अनामत रकमेसाठी दि.२०/३/२०१८ च्या मा.महापालिका सभेत उपसूचना सादर करुन वाढ करणे शक्य होते. मात्र सदरची उपसूचना मंजूर होण्यास ७ ते ८ दिवसाचा कालावधी जाणार असल्याने तोपर्यंत अनामत परतावा प्रकरणे प्रलंबित ठेवणे योग्य होणार नव्हते, र.रुपये १५० कोटीची रक्कम तातडीने अदा करणेकामी तरतूदीत वाढ करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मध्ये नमूद केलेप्रमाणे ठेकेदार अनामत रकमेवर र.रु.१५० कोटी वाढ करणेत आलेली आहे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क)

नुसार "कोणत्याही आणिबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा मनपाच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणिबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्या या अधिनियमान्वये दुस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्राधिका-या शिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे परंतू आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाचे तरतूदीन्वये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महापालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे. मा.आयुक्त यांचेकडील दि.१९/३/२०१७ चा प्रस्ताव अन्वये सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात भाग-३ मध्ये र.रु.१५०,००,००,०००/- (अक्षरी र.रु.दीडशे कोटी फक्त) लेखा विभागाकडील "ठेकेदार अनामत" या लेखाशिर्षावर वाढ करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार वाढ करण्यात आलेल्या रक्कमे विषयीचे इतिवृत्त मा.महापालिका सभेचे अवलोकनार्थ ठेवणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक -२६०६ विषय क्रमांक - २३

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

महापालिकेच्या वतीने उद्यान विभागाकडून बुके, फुले, शाल, श्रीफळ यांचा वापर विविध सत्कार समारंभात केला जातो. सेवा निवृत्त कर्मचारी सत्कार, विविध समित्यांचे सदस्य व पदाधिकारी नियुक्ती सत्कार, क्रीडा विभागाकडून खेळाडू सत्कार तसेच महापालिकेत येणा-या अतिथी सत्कार, इ. या कार्यक्रमासाठी खर्च होतो. बुकेंमधील फुलांचे दुस-या दिवशी कच-यात रुपांतर होते. सध्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणात स्वच्छ भारत अभियान मोहिम राबवली जात आहे. त्या अनुषंगाने यापुढे महापालिकेकडून केल्या जाणा-या विविध सत्कार समारंभात बुके, फुले, शाल, श्रीफळ यांचा वापर न करता, सत्कार समारंभाचे स्वरुप विचारात घेवून महापालिकेच्या नर्सरी मध्ये तयार केलेली रोपे किंवा उपयोगी पुस्तके याचाच वापर करणेस व त्याप्रमाणे धोरण निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. या प्रमाणे प्रशासनाने परिपत्रक काढणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२६०७ विषय क्रमांक - २४

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

महापालिकेच्या वतीने प्रतिवर्षी दैनंदिनी (डायरी) छपाई केली जाते. सदरची छपाई विहित वेळेत केली जात नाही. तसेच दैनंदिनी (डायरी) छपाईसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. तरी यापुढे महापालिकेमार्फत कायमस्वरुपी, मोठ्या साईजची दैनंदिनी (डायरी) छपाई न करता केवळ लहान साईजची पॉकेट दैनंदिनी (डायरी) छपाई करणेस व त्याप्रमाणे धोरण निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रशासनाने याबाबत परिपत्रक काढणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०८ विषय क्रमांक - २५

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५८०, दि.१८/४/२०१८ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.वृक्ष प्राधिकरण समिती व मनपा कर्मचारी यांना दि.३/५/२०१८ ते ८/५/२०१८ अखेर सिक्कीम अभ्यास दौ-यास जाण्यास व त्यासाठी येणा-या ९,५३,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर ठराव रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६०९ विषय क्रमांक - २६

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा क्र.५९ दि.१८/०४/२०१८ मधील ठराव क्रमांक २५८१ मध्ये - मे.ओम साई फाऊंडेशन या संस्थेस पिंपरी वाघेरे स.नं.२०२ येथील १०० चौ.मी. जागा पार्कींगसाठी योग्य त्या भाडे दजराने ११ महिने कालावधीसाठी देणेस मान्यता दिलेली आहे. या ठरावामध्ये दुरुस्ती करुन “मे.ओम साई फाऊंडेशन या संस्थेस पिंपरी वाघेरे स.नं.२०२ येथील १००० चौ.मी. जागा पार्कींगसाठी योग्य त्या भाडे दराने ११ महिने कालावधीसाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.” याप्रमाणे मजकूर नमूद करण्यास व ठराव दुरुस्त करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१० विषय क्रमांक - २७

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड क्षेत्रातील व बस संचालनालयाचे नियंत्रण सध्या पुणे शहरातील कार्यालयातुन होत असल्याने बसेस वारंवार रद्द होणे, नियोजीत वेळेत बस न सुटने, बसेसच्या खेपा रद्द होणे याबाबत वारंवार नागरिकांच्या तक्रारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसदस्यांना प्राप्त होतात. त्या तक्रारीचे सोडवणुक करणेकरीता व बस संचालनालयाचे काम अधिक प्रभावीपणे होण्यासाठी पुर्वीप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील बस संचालनयासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ क्र.२ नारायण मेघाजी लोखंडे सभागृह, पिंपरी या ठिकाणी सुरु करणेबाबत मान्यता देणेत येत आहे. सदर मुख्यालय क्र.२ मध्ये पुर्वीचे अनुभवी कर्मचारी नियुक्त करावेत व त्यांचे नियंत्रणासाठी सक्षम अधिका-यांची नियुक्ती करणेत यावी. त्याचप्रमाणे पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. प्रशासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पदाधिकारी व नगरसदस्य यांचेमध्ये वेळोवेळी समन्वय साधणेसाठी मुख्यालय क्र.२ येथे पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील कर्मचारी श्री.संजय दशरथ कुटे यांची नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६११ विषय क्रमांक - २८

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठ.क्र.२५३८ दिनांक १८/४/२०१८ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा.नगरसेविका यांचेसाठी केरळ दौरा दिनांक ८/४/२०१८ ते १३/४/२०१८ या कालावधीसाठी मान्यता देण्यात आली होती. व त्यासाठी येणा-या र.रु.३,३७,८६०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर ठराव रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१२ विषय क्रमांक - २९

दिनांक – २५/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत प्रसिद्ध केलेली ई-निविदा रद्द करुन नवीन कोर्सेस सुरु करणे या विषयाबाबत ई-निविदा नोटीस क्र.१/२०१८/१९ ही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेचा स्विकृत कालावधी दि.९/४/२०१८ ते दि.७/५/२०१८ पर्यंत आहे. तथापि, ही संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तरी या संदर्भात तात्काळ तज्ञांची नेमणूक करुन तसेच पिंपरी चिंचवड परिसरातील कंपन्यांच्या मागणीचा अभ्यास करुन व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित करण्यात यावा. व सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला आय.टी.आय. कासारवाडी व आवश्यकता असल्यास पुरुषांसाठी आय.टी.आय. मोरवाडी, पिंपरी यांच्यामार्फत राबविणेचे नियोजन करावे.

सदर व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम ठरविताने जुने कालबाह्य व पुनरावृत्ती झालेले प्रशिक्षण वगळून पुढीलप्रमाणे व आवश्यकतेनुसार इतर प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश करण्यात यावा. उदा.योगा, जिम, मसाज-ट्रेनर, फिजीओथेरपी, आहार समुपदेशन, नर्सिंग, आया, पाळणाघर, स्टेनो (लघुलेखक), अकाऊंटींग, टॅली, लॉन्ड्री, प्रि स्कुल मॅनेजमेंट, घरकाम करणा-या महिलांसाठी प्रशिक्षण, एम.एस.ऑफीस कोर्सेस, मॅनेजमेंट कोर्सेस, किरकोळ मोबाईल दुरुस्ती, इलेक्ट्रीक उपकरणे दुरुस्ती, मोटर मेकॅनिक, पैशांची गुंतवणूक करणे इ.

तसेच जेथे शक्य आहे तेथे पैशाची बचत करणे व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये आधुनिकता आणणेकामी सामाजिक जबाबदारीचे दृष्टीने (सी.एस.आर) माध्यमातून देखील असे कोर्सेस घेण्यात येवून त्यास प्रशासनाने हे कोर्सेस लवकर चालू करण्याबाबत तात्काळ कारवाई करण्याबाबत मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१३ विषय क्रमांक - ३०

दिनांक – २५/०४/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/२/कावि/२१/२०१८ दि.२५/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.Air India यांचेकडील Shubh Yatra Magazine – Infliight magazine of Air India (Domestic & Internationa; Sector) मासिक विविध देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करणेत

येते. उक्त प्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्प पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड अंतर्गत राबविणेत येत आहे. सदर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड अंतर्गत राबविणेत येणाऱ्या सर्व प्रकल्पांची माहिती मे. Air India यांचेकडील मासिकामार्फत विविध देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करणेत येणार असल्याने तसेच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडचे कामकाज उच्चस्तरीय होणेकामी मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार Option 2-2 pages- Ad/Advertorial – Rs.32,74,000/- तसेच विशेष सुट म्हणुन र.रु.५,२५,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख पंचवीस हजार फक्त) अधिक ५% G.S.T. कर आगाऊ रक्कम देवुन करारनामा न करता थेट पद्धतीने मासिकामध्ये लेख प्रसिद्ध करणेकामी मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरची रक्कमेची तरतुद माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील स्मार्ट सिटी या लेखाशिर्षातुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१६०/२०१८
दिनांक - २६/०४/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.अग्नि/२/कावि/३८३/२०१८ दि.०६/०४/२०१८ विषय क्र.२ चे लगत)

प्रपत्र – अ

कनिष्ठ अभिंयंता – ०१ पद (एकाकी पद प्रवर्ग नाही) एकवट वेतन र.रु २०,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. पवार जयदिप हरिश्चंद्र | एकाकी पदास संवर्ग नाही |

पंप मेकॅनिक – ०२ पदे (अनु.जाती. – ०१, खुला -०१) एकवट वेतन र.रु १५,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. कांबळे मनिष रमेश | खुला |
| २ | श्री. सपकाळ ज्ञानेश्वर भागोजी | संवर्ग नाही |

मोटर मेकॅनिक – ०३ पदे (अनु. जाती. – ०१, खुला – ०२) एकवट वेतन र.रु १५,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. सय्यद इनायत शौकत | खुला |
| २ | श्री. बुचडे समिर सतिश | खुला |
| ३ | श्री. माणिकमोते जगदिश मरीबा | अनु. जाती. |

अतिरीक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

(क्र.स्था/नि/फ-मुख्य/२३५/२०१८ दि.०६/०३/२०१८ विषय क्र.३ चे लगत)

(५)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य फ मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/२३५/२०१८
दि. ६/३/२०१८

प्रपत्र अ (१ ते १६)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| १ | मे.ग्लोबल कन्स्ट्रक्शन | ५५/५/२०१७-१८ | प्रभाग क्र १ रूपीनगर मधील संत तुकारामनगर परिसरातील पेव्हींग ब्लॉक दुरूस्ती करणे | १७/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/१९८/२०१८ | २०/०१/१८ | २१,००,४७६ | ३८.९९ | %कमी | १२८१५०० |
| २ | श्री साठे इन्फ्रा. प्रा.लि. | १९/२२/२०१७-१८ | प्रभाग क. २८ मसुळकर कॉलनी मधील सुरक्षा रक्षकांसाठी केबीन बांधणे | ०८/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/१९९/२०१८ | २०/०१/१८ | २१,००,००० | २१.२१ | %कमी | १६५४५९० |
| ३ | सरल इंजिनिअर्स ऍन्ड कन्स्ट्रक्टर्स | ५३/२१/२०१७-१८ | जाधववाडी कुदळवाडी भागातील क्रिडा विषयक सोयी सुविधा निर्माण करणे | १७/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२०२/२०१८ | २३/०१/१८ | २१,००,७४७ | २९.८४ | %कमी | १४७३८८४ |
| ४ | पी.ए.शिरोळे इंजिनिअर्स ऍन्ड कॉन्ट्रॅक्टर्स | ५३/३१/२०१७-१८ | प्रभाग क्र. २८ मासुळकर येथील यशवंतनगर चौकाचे सुशोभिकरण काम करणे | १५/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२०३/२०१८ | २३/०१/१८ | २३,३३,८०० | २२.६९ | %कमी | १८०४२६१ |
| ५ | अनंत बाळक्रीन्श बहिरट | ५५/११/२०१७-१८ | प्रभाग क्र १ रूपीनगर तळवडे विकास सोसायटी येथील स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे | १७/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२०५/२०१८ | ३०/०१/१८ | २३,१०,७९७ | ३५.३५ | %कमी | १४९३९३० |
| ६ | मोहनलाल मथराणी कन्स्ट्र.प्रा.लि. | १९/२०/२०१७-१८ | प्रभाग क्र. ५ कुदळवाडी मधील विविध रस्ते डांबरी करण करणे. | ०१/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२०८/२०१८ | ३१/०१/१८ | २१,००,०९३ | ३.७० | %कमी | २०२२३९० |
| ७ | मोहनलाल मथराणी कन्स्ट्र.प्रा.लि. | १९/२८/२०१७-१८ | प्रभाग क्र. ५ जाधववाडी मधील विविध रस्ते डांबरी करण करणे | ०१/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२०९/२०१८ | ३१/०१/१८ | २१,००,५६० | ३.३० | %कमी | २०३१२४२ |
| ८ | अडेप्ट एंटरप्रायजेस | ५३/२/२०१७-१८ | प्रभाग क. ४ कृष्णानगर मध्ये एफ आर वाचनालय बसविणे | १२/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२११/२०१८ | ०५/०२/१८ | २१,००,३७३ | १.०० | %कमी | २०७९३६९ |

(५)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | एन.डी.प्लास्टेक | ७२/७/२०१७-१८ | प्रभाग क्र ३ चिखली मोरेवस्ती गणेशनगर रामदासनगर केशवनगर भागात FRP वाचनालये बोर्ड बेंचेसची कामे करणे | ३१/०१/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२१७/२०१८ | १६/०२/१८ | १३,९९,४२५ | १.०० | %कमी | १३८५४३१ |
| १० | श्रीगणेश बाळक्रीन्श पोरे | ११/६३/२०१७-१८ | प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मध्ये सांस्कृतीक कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | २३/०२/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२२७/२०१८ | २७/०२/१८ | २१,००,८४० | १२.०० | %कमी | १८४८७३९ |
| ११ | क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ७३/६२/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ नवी सांगवी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २८/०२/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२२९/२०१८ | ०३/०३/१८ | ११,२०,३८२ | १६.७० | %कमी | ९३३२७८ |
| १२ | क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ७३/२५/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ विविध सेवा वाहिन्यांचे चर बुजविणे. | २८/०२/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२३०/२०१८ | ०३/०३/१८ | ११,१८,९२७ | १४.५६ | %कमी | ९५६०११ |
| १३ | मल्हार इन्फ्रा.आणि गार्डन सर्व्ही. | ७३/१४/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी येथील पवना घाट सुशोभिकरण करणे. | २७/०२/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२३१/२०१८ | ०३/०३/१८ | १२,००,००० | २७.२७ | %कमी | ८७२७६० |
| १४ | श्री कन्स्ट्रक्शन शैलेंद्र शिवाजी फाळके | ५३/३८/२०१७-१८ | प्रभाग क्र. २८ मध्ये अंपग कल्यानकारी योजनाच्या माध्यमातून सुविधा निर्माण करणे. | १६/०२/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२३२/२०१८ | ०३/०३/१८ | २१,००,१८७ | २१.८५ | %कमी | १६४१२९६ |
| १५ | देव कन्स्ट्रक्शन | ७३/६४/२०१७-१८ | प्रभाग क्र १ तळवडे मधील बाठेवस्ती येथील नाल्याला CD वर्क बांधणे | ०१/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२३३/२०१८ | ०३/०३/१८ | २१,००,४७१ | ३८.९४ | %कमी | १२८२५४८ |
| १६ | पी जे मोटवाणी | ७३/५४/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | ०१/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२३४/२०१८ | ०३/०३/१८ | १५,००,००० | २८.१६ | %कमी | १०७७६०० |

शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

(क्र.फक्षेका/नि-४/कावि/२५५/२०१८ दि.१७/०४/२०१८ विषय क्र.४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44

(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/255/2018 दि. 17 /04/2018 लगत) प्रपत्र "अ"

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.के. पी. इलेक्ट्रीकल्स कॉर्पोरेशन | 4/27/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत चिखली तळवडे उप विभाग मधील स्ट्रिट लाईट पोल वरील खराब नादुरूस्त जक्शंन बॉक्स बदलणे.सन २०१७ - १८ | 5/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/219/2018 | 15/03/2018 | 449460 | -7.00 % कमी | 417998 |
| 2 | मे.के. पी. इलेक्ट्रीकल्स कॉर्पोरेशन | 4/31/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत चिखली तळवडे उप विभाग मधील उद्यानातील विद्युतविषयक देखभाल दुरुस्ती करणे. सन २०१७ - १८ | 5/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/220/2018 | 15/03/2018 | 450000 | -7.00 % कमी | 418500 |
| 3 | मे.अबान इलेक्ट्रीकल्स | 4/26/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत निगडी गावठाण उपविभागा मधील दिवाबत्ती व्यवस्थे मधील खांबाची रंगरंगोटी (पेटींग) करणे.सन २०१७ - १८ | 5/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/254/2018 | 17/04/2018 | 299340 | -5.00 % कमी | 284373 |

क्षेत्रिय अधिकारी
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(क्र.विमुका/५/कावि/१९५/२०१८ दि.१७/०४/२०१८ विषय क्र.६ चे लगत)

(L)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, विद्युत मुख्यालय ( इ व फ मुख्यालय ) , पिंपरी - 18
विषयपत्र क्र.विमुका/5/कावि/ 195 /2018 दि. 17-4-2018

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | मे.न्युक्लॉनिक्स ट्रॅफिक सोल्युशन्स प्रा.लि. | 17/10 - 2017/18 | ई क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत पुणे नाशिक रस्त्याच्या पश्चीम भागातील रस्त्यावरील विविध चौकात आवश्यकतेनुसार ट्राफिक सिग्नल बसविणे व नुतनीकरण करणे.(नविन प्र. क्र. ३ ते ८) | 3/3/2018 | क्र.विमुका/5/कावि/179/2018 दि. 14/3/2018 | 14/03/2018 | 1049999 | 10.01% कमी | 944894 |
| 2 | मे.एनर्जी टेक सिस्टिम | 17/34-2017/18 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध शहरी गरीब वस्तीमध्ये प्रकाश व्यवस्था करणे. सन २०१७ - २०१८. | 9/3/2018 | क्र.विमुका/5/कावि/178/2018 दि. 14/3/2018 | 14/03/2018 | 1417461 | 18.07% कमी | 1161326 |
| 3 | मे.एनर्जी टेक सिस्टिम | 17/24/2017-18 | प्रभाग क्र १२ मधील मोकळया जागेत उद्यान विकसित करणे.( सन २०१७ - २०१८ ) | 26/2/2018 | क्र.विमुका/5/कावि/169/2018 दि. 8/3/2018 | 8/3/2018 | 750000 | 14.02% कमी | 644850 |
| 4 | मे.एनर्जी टेक सिस्टिम | 17/9/2017-18 | मनपाच्या फ क्षेत्रिय कार्यालयातंर्गत नव्याने विकसीत होणा-या उद्यानांचे विद्युतीकरण करणे. ( सन २०१७ - २०१८ ) | 26/2/2018 | क्र.विमुका/5/कावि/170/2018 दि. 8/3/2018 | 8/3/2018 | 750000 | 12.76% कमी | 654300 |
| 5 | मे. विमलाई इलेक्ट्रिकल कॉर्पोरेशन, | 17/12/2017-18 | नविन प्रभाग क्र. ३ मधील गरीब शहरी वस्तीतील दिवाबत्तीचे वार्षीक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. | 23/2/2018 | क्र.विमुका/5/कावि/167/2018 दि. 8/3/2018 | 8/3/2018 | 1198044 | 19.92% कमी | 959394 |
| 6 | मे. विमलाई इलेक्ट्रिकल कॉर्पोरेशन | 17/27-2017/18 | मोशी उपविभागातील शहरी गरीब भागातील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेचे देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | 23/2/2018 | क्र.विमुका/5/कावि/168/2018 दि.8/3/2018 | 8/ /3/2018 | 1049952 | 19.91% कमी | 840907 |
| 7 | मे. आर एन एंटरप्रायजेस | 17/7-2017/18 | दिघी उपविभागातील नविन प्र. ४ बोपखेल, गणेशनगर येथील रस्त्यावरील स्ट्रीट लाईटचे नूतनीकरण करणे. | 5/3/2018 | क्र.विमुका/8/कावि/187/2018 दि. 22/3/2018 | 22/3/2018 | 749839 | 18.10 % कमी | 614118 |
| 8 | मे.अथर्व इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस | 10/16-2017/18 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चिखली तळवडे उपविभागामधील नव्याने होणाऱ्या रस्त्यावर दिवाबत्तीची व्यवस्था करणे. ( डी.पी व इतर रस्ते) (सन २०१७-२०१८) | 11/1/2018 | क्र.विमुका/5/कावि/175/2018 दि. 9/3/2018 | 9/3/2018 | 2399995 | 10.78% कमी | 2141276 |
| | | | | | | | 9365290 | | 7961065 |

सह-शहर अभियंता ( वि/यां )
पिंपरी चिंचवड महानगरपालिका